# जिल्हयाधिका-यांनी आपल्या जिल्हयाच्या संकेतस्थळावर (Web Site ) वर ठेवावयाची माहिती

## बाल विकास क्षेत्रात विविध शासकीय समित्यांवर सदस्य आवश्यक.

शासनाच्या महिला व बाल विकास विभागांतर्गत बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण ) अधिनियम, २००० नुसार स्थापन करण्यात आलेल्या राज्य सल्लागार मंडळ, जिल्हा सल्लागार मंडळ, बाल कल्याण समिती व बाल न्याय मंडळ अशा व इतर समित्या व मंडळांवर बाल विकास क्षेत्रातील कार्यकर्त्यांची अशासकीय सदस्य म्हणून आवश्यकता आहे.

सदर मंडळ / समित्यांची कार्य व रचना खालीलप्रमाणे आहे :-

### (१) राज्य सल्लागार मंडळ

राज्य सल्लागार मंडळ, बालगृहांची स्थापना आणि त्यांचे परिरक्षण करणे, साधनसंपत्ती उभारणे, काळजी आणि संरक्षणाची गरज असलेल्या बालकाचे आणि विधिसंघर्षग्रस्त बालांचे शिक्षण, प्रशिक्षण आणि पुनर्वसन या सुविधा पुरविणे आणि संबंधित विविध शासकीय व अशासकीय अभिकरणांमध्ये समन्वय साधणे इत्यादीशी संबंधित बाबींवर शासनाला सल्ला देईल.

राज्य सल्लागार मंडळाची रचना पुढीलप्रमाणे आहे.

(१) उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायाधीश किंवा सेवानिवृत्त सचिव - अध्यक्ष
(२) प्रधान सचिव, महिला व बाल विकास विभाग - सदस्य
(३) आरोग्य महासंचालक किंवा त्याचा प्रतिनिधी - सदस्य
(४) संचालक, शालेय शिक्षण किंवा त्यांचा प्रतिनिधी - सदस्य
(५) पोलीस उप महानिरिक्षक (महिलांवरील अत्याचार प्रतिबंध) किंवा त्यांचा प्रतिनिधी - सदस्य
(६) बाल विकासाच्या क्षेत्रात कार्यरत असणा-या विख्यात स्वयंसेवी संघटनांचे दोन प्रतिनिधी. -सदस्य(अशासकीय सदस्य)
(७) शैक्षणिक संस्थेचे किंवा विद्यापीठाचे प्रतिनिधी. -सदस्य (अशासकीय सदस्य)
(८) निगम निकाय (कॉर्पोरेट) क्षेत्रातील प्रतिनिधी - सदस्य(अशासकीय सदस्य)
(९) आरोग्य, बालमानसशास्त्र इत्यादी क्षेत्रातील तज्ञ व्यक्ती -सदस्य(अशासकीय सदस्य)
(१०)आयुक्त, महिला व बाल विकास - सदस्य सचिव

### (२) जिल्हा सल्लागार मंडळ

बाल न्याय कायद्यांतर्गत बालकांसाठी कार्यरत शासकीय व स्वयंसेवी संस्थांच्या कामकाजाचा आढावा घेणे, सदर बालकांच्या संस्थांना भेटी देणे व संस्थांच्या सुधारणा व विकासासाठी राज्य शासनास सल्ला देणे, तपासणीच्या वेळी मुलांशी परस्पर संवाद साधणे आणि राज्य शासन व राज्य स्तरीय सल्लागार मंडळाने दिलेल्या निदेशानुसार कार्यवाही करणे याकरिता जिल्हा सल्लागार मंडळाची स्थापना करण्यात आली आहे.

जिल्हा सल्लागार मंडळाची रचना पुढीलप्रमाणे आहे.

(१) बाल कल्याण क्षेत्रातील विख्यात सामाजिक कार्यकर्ता - अध्यक्ष (अशासकीय सदस्य)
(२) पोलीस आयुक्तांचा प्रतिनिधी किंवा पोलीस अधीक्षक - सदस्य
(३) जिल्हा आरोग्य अधिकारी - सदस्य
(४) स्वयंसेवी संघटनेचा प्रतिनिधी - सदस्य (अशासकीय सदस्य)
(५) मंडळाचा सदस्य - सदस्य
(६) समितीचा सदस्य - सदस्य
(७) जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी - सदस्य सचिव

राज्य व जिल्हा सल्लागार मंडळाच्या कामकाजाचे स्वरुप व अनुज्ञेय भत्ते--

सदर सल्लागार मंडळांना तीन महिन्यातून किमान एक बैठक आयोजित करणे बंधनकारक आहे. तसेच सदर सल्लागार मंडळे ही बालगृहांकरिता तपासणी समिती म्हणून सुध्दा कार्य करीत असल्याने त्यांना आवश्यकतेनुसार बालगृह व इतर संस्थांना भेटी देण्याची आवश्यकता भासते. तसेच प्रसंगानुरुप आवश्यकतेनुसार सदर मंडळांना अतिरिक्त बैठका घ्याव्या लागतात.

याकरिता सदर सल्लागार मंडळ सदस्यांना महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय दि.३१ ऑक्टोबर, २००३ व शासन निर्णय दि.२७ मार्च, २००३ अन्वये शासनाने विहित केल्यानुसार प्रवासभत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय आहे. या व्यतिरिक्त कुठलेही वेतन, मानधन अथवा भत्ते अनुज्ञेय नाहीत.

(३) बाल कल्याण समिती

महाराष्ट्र शासनाने प्रत्येक जिल्हयासाठी एक अशा ३५ जिल्हयांत बाल कल्याण समितीची स्थापना केली आहे. बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण ) अधिनियम, २००० या कायद्यांतर्गत बाल कल्याण समितीची सर्व मुलांच्या काळजी व संरक्षणाकरिता एक कार्यक्षम व्यवस्था म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. बाल कल्याण समितीत एक अध्यक्ष व ४ सदस्य असतात, त्यातील किमान एक सदस्य महिला असते, सदर पाच सदस्य हे बाल विकास क्षेत्रातील सामाजिक कार्यकर्त्यांमधून निवडले जातात.सदर बाल कल्याण समिती दंडाधिकाऱ्यांचे न्यायपीठ म्हणून कायद्यातील तरतुदीनुसार कार्य पहाते. बाल कल्याण समितीकडे मुलांची काळजी, संरक्षण व पुनर्वसनाबाबत प्रकरणे निकालात काढण्याचे अंतिम अधिकार आहेत.

(४) बाल न्याय मंडळ

महाराष्ट्र शासनाने प्रत्येक जिल्हयासाठी एक अशा ३५ जिल्हयांत बाल न्याय मंडळांची स्थापना केली आहे. बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण ) अधिनियम, २००० या कायद्यांतर्गत सदर बाल न्याय मंडळाची विधी संघर्षग्रस्त बालकांची प्रकरणे निकाली काढण्याकरिता स्थापना करण्यात आली आहे. सदर मंडळात महानगर दंडाधिकारी किंवा यथास्थिती प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी आणि दोन सामाजिक कार्यकर्ते असतात. त्यापैकी किमान एक महिला सदस्य असते. सदर सामाजिक कार्यकर्त्यांना मुलांच्या संबंधातील आरोग्य, शिक्षण किंवा कल्याण कार्यक्रम यात किमान ७ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे. सदर मंडळ हे दंडाधिकाऱ्यांचे एक न्यायपीठ म्हणून कायद्यातील तरतुदीनुसार कार्य पहाते.

बाल कल्याण समिती व बाल न्याय मंडळांच्या कामकाजाचे स्वरुप व अनुज्ञेय भत्ते.

बाल कल्याण समितीपुढे येणाऱ्या काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांच्या प्रकरणांचे प्रमाण/ व बाल न्याय मंडळापुढे येणाऱ्या विधी संघर्षग्रस्त बालकांच्या प्रकरणांच्या प्रमाणानुसार सदर समिती किंवा मंडळाला आठवडयाला साधारण २ ते ३ (आवश्यकतेनुसार कमी जास्त ) बैठका घ्याव्या लागतात. तसेच आवश्यकतेनुसार अनाथ व निराश्रित बालकांच्या संस्थांना भेटी द्याव्या लागतात.

याकरिता बाल कल्याण समिती व बाल न्याय मंडळाचे अध्यक्ष / सदस्य यांना प्रती बैठक रु.५००/-इतका बैठक भत्ता व शासन निर्णय दिनांक १३ जुलै, २००४ अन्वये शासनाने विहित

केल्यानुसार वाहन भत्ता, प्रवास भत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय आहे. या व्यतिरिक्त कुठलेही वेतन, भत्ते, मानधन अनुज्ञेय नाही.

वरील मंडळ / समित्या या बालकांची काळजी, संरक्षण, वागणूक, विकास, पुनर्वसन यात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या सहभागी होत असतात. त्यामुळे त्यात असणाऱ्या अशासकीय सदस्यांना बालकांबाबत प्रश्नांची वा बाल विकासाची तळमळ असणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर मंडळावर सुयोग्य व्यक्ती निवडल्या जाव्यात यासाठी शासन प्रयत्नशील आहे. यासंदर्भात मा.उच्च न्यायालयाने सुध्दा अशा समित्या / मंडळावर संवेदनशील व आवश्यक पात्रता धारण करणाऱ्यां सुयोग्य व्यक्तींची निवड करण्याचे निर्देश दिले आहेत. याकरिता शासन सर्व जिल्हयांतील बाल विकास क्षेत्रात कार्यरत इच्छूक व अनुभवी व्यक्तींकडून अशासकीय सदस्य म्हणून मानधनी नियुक्तीकरिता अर्ज मागवित आहे.

<u>अर्ज करण्याची पध्दत</u>

अर्ज करणारा उमेदवार हा किमान पदवीधर असणे आवश्यक आहे.

इच्छूक उमेदवाराने आपला अर्ज वैयक्तिक तपशीलासह (Bio-data सह) आपल्या जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे **दि.३०.०४.२०११ पर्यंत** सादर करावा आणि त्याची एक प्रत आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, २८, राणीचा बाग, पुणे -४११ ००१ यांना सादर करावे. तसेच खालील ई-मेलवर अर्जाची प्रत पाठवावी.

१.dy.commissionercd@ yahoo.com

२.dod3wcd@gmail.com

आपल्या वैयक्तिक तपशीलात उमेदवाराने खालील बाबींचा समावेश करणे आवश्यक राहील.

(१) नांव

(२) पत्ता व दूरध्वनी क्रमांक, ई-मेल आय.डी.

(३) शैक्षणिक अर्हता

(४) नोकरी /व्यवसायाबाबत तपशील

(५) कार्यालयाचा पत्ता व दूरध्वनी क्रमांक

(६) बाल विकास क्षेत्रातील अनुभव आहे कां? असल्यास तपशील

(७) उमेदवाराची स्वतःची बालकांकरिता संस्था आहे कां, किंवा बालकांकरिता असलेल्या इतर संस्था किंवा राजकीय क्षेत्र यांच्याशी उमेदवार अथवा जवळचा नातेवाईक संलग्न आहे का? असल्यास तपशील.

(८) उमेदवारावर फौजदारी गुन्हा दाखल आहे कां, किंवा इतर कुठल्याही प्रकारची चौकशी सुरु आहे का, असल्यास तपशील.

(९) उमेदवाराने या आधी बाल कल्याण समिती / बाल न्याय मंडळ यावर अध्यक्ष / सदस्य म्हणून काम केलेले आहे काय, असल्यास तपशील

(१०) नोकरी अथवा व्यवसाय सांभाळून समिती / मंडळावर कार्य करण्यास पुरेसा वेळ देण्याची सदस्यांची तयारी व क्षमता आहे काय?

(११) १०० ते २०० शब्दात "मी बाल कल्याणाकरिता कसे योगदान देवू शकतो" या विषयावर उमेदवाराने आपले विवेचन द्यावे.

सदर माहिती <u>www.maharashtra.Gov.in</u> वर सुध्दा उपलब्ध आहे.

--------------

## प्रसिध्दी पत्रक

## बाल कल्याण शासकीय समित्यांवर सदस्य आवश्यक

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण ) अधिनियम २००० नुसार, राज्य शासनाच्या महिला व बाल विकास विभागातंर्गत स्थापन करण्यात आलेल्या राज्य सल्लागार मंडळ, जिल्हा सल्लागार मंडळ, बाल कल्याण समिती, बाल न्याय मंडळ इ. समित्या व मंडळावर बाल विकास क्षेत्रात काम करण्यास इच्छूक व अनुभवी व्यक्तींची मानधनी अशासकीय सदस्य म्हणून नियुक्ती करण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहे. इच्छूक व्यक्तींने आपले अर्ज आपल्या वैयक्तिक तपशीला सह ( Bio -Data ) आपल्या जिल्हयांच्या जिल्हाधिका-यांकडे दिनांक ३०.४.२०११ पर्यंत सादर करावेत व त्याची एक प्रत आयुक्त, महिला व बाल विकास , आयुक्तालय, २८ , राणीचा बाग, पुणे-४११ ००१ यांना सादर करावी. तसेच सदर अर्जाची एक प्रत dy.commissionercd@yahoo.com व dod3wcd@gmail.com या ई-मेलवर सुध्दा अग्रेषित करावी. सविस्तर माहिती www.maharashtra.gov.in आणि ------- (जिल्हयाधिका-यांनी आपल्या जिल्हयाचे संकेतस्थळ येथे नमूद करावे ) वर उपलब्ध आहे.

## Press Note

## Members needed for government child welfare committees

Women and Child Development department , Government of Maharashtra , invites applications from interested persons who wish to work in the area of child welfare and child care institutions, to be appointed as Honorary members on state and district level "committees and boards. Applicants may apply with their bio data to the concerned District Collector, with a copy to Commissioner, Women and Child development , 28, Queens Garden. Pune-411 001. Also forward a copy of your Bio-data to dy.commissionercd@yahoo.com & dod3wcd@gmail.com. Details are available on www.maharashtra.gov.in. and ------ & ( Add Districts web site )